याचा अंदाज येईल.

2) रोजगाराच्या दिशेने पाउल: आजच्या घडीला मत्स्यपालनात महत्वाचा अडसर आहे तलाव लिजवर घेण्यासाठी पैशाची कमतरता. या कमतरतेमुळे सधन लोक आणि गटच निलामीत तलाव घेतात. अशा परिस्थितीत मासेमारी करणाऱ्या जमातींसाठी आणि मस्त्यपालन गटांसाठी सरकारच्या विविध योजनांची माहिती संग्रहित करणे आणि मराठी भाषेत पुस्तक रुपात लोकांसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मस्त्यपालन विभाग, सिंचन विभाग आणि इतर संबंधीत सरकारी विभाग आणि गावातील लोक यांच्यात कशा प्रकारे समन्वय स्थापीत करता येईल हे बघणे. आर्थिक स्वावलंबनाच्या उद्देशाने मस्त्य गटाद्वारे, सरकारी आर्थिक मदतीने व अन्य आर्थिक स्त्रोतांद्वारे शास्त्रिय पद्धतीने, शक्य असेल तेथे स्थानिक मास्यांचे उत्पादन करणे. पण पुर्णपणे सरकारी मदतीवर अवलंबून न राहता बचत गटासारख्या माध्यमांच्या आधारे आर्थिक स्वावलंबनाचे उद्दीष्ट्य साध्य करणे.

सर्वसहमतीने अभ्यासपुर्वक निर्णय घेतल्यास शास्वत जीवनाच्या दिशेने नक्कीच वाटचाल करता येईल. यासाठी नियमीतपणे एकत्र बसण्याची चर्चा करण्याची आणि सामुहीक निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता आहे. प्रत्येक गावात अभ्यासाची आवड असणारे काही लोक असतातच असा आमचा विश्वास आहे, अशा लोकांनी एकत्र येवून अभ्यासपुर्वक कृती केली तर शास्वत विकास होऊ शकतो.

3) संघटन: (राजकीय नव्हे!)

विविध गावात लोकांचे अभ्यास गट तयार करणे. नदीच्या जवळपासच्या गावात **नदी अभ्यास मंडळ** स्थापित करणे.

4) प्रत्यक्ष कृती:

नदी अभ्यास मंडळाच्या वतीने प्रत्यक्ष कृती करणे. उदाहरणार्थ: काही महत्वाच्या जागा मासेमारी साठी प्रतीबंधीत क्षेत्र म्हणून घोषीत करणे, चुकीच्या पद्धतीने केल्या जाणारी मासेमारी (उदा. विषाचा उपयोग करुन) रोखणे, आपले अधिकार मिळवण्यासाठी शांततेच्या मार्गाने आणि माहितीच्या आधारावर प्रयत्न करणे इत्यादी.

जीवजातींचे, नदीचे संवर्धन, संसाधनांचा शास्वत उपयोग आणि शास्वत रोजगाराचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता सर्वांनी एकत्र येवून विचारविनीमय करण्याची, अभ्यास करण्याची आणि प्रत्यक्ष कृती करण्याची गरज आहे. नदी म्हणजे केवळ वाहता पाण्याचा प्रवाह नाही तर ती विविध घटकांची एक परस्पर निर्भर व्यवस्था आहे. एका घटकात जर दोष उत्पन्न होत असेल तर त्याचे दुष्परीणाम संपूर्ण जीवसृष्टीला भोगावे लागू शकतात.

अशा विविध घटकांचा सहभागी पद्धतीने अभ्यास केला तरच निसर्ग टिकेल आणि नैसर्गिक संसाधने शास्वत पद्धतीने आपल्यालाच नाही तर येणाऱ्या अनेक पि ांना वापरता येतील.पण हा प्रवास एकाचा नाही. अनेक लोकांनी एकत्र येवून कार्य केल्यासच हे शक्य आहे. स्थानिक मासेमारांची तर ह्यात मदत अपेक्षीत आहेच पण त्याच सोबत विविध सरकारी विभाग (उदा. मत्स्य पालन विभाग, सिंचन विभाग), शाळा कॉलेजचे शिक्षक विध्यार्थी, विविध सहकारी व समाजसेवी संस्था, जागृत नागरीकांची सुद्धा ह्यात मदत होणे अपेक्षीत आहे. अधीक माहिती आणि सहभागी होण्याकरीता:

संपर्क:

डॉ. निलेश हेडा,

संवर्धन संस्था

कारंजा (लाड), जिल्हा वाशीम 444105 (महाराष्ट्र) फोन: 07256-225050 (निवास), 09970167070 (भ्रमणध्वणी) इमेल: nilheda@gmail.com

वेबसाईट: www.freewebs.com/samvardhan

सदर अभ्यासाला सर दोराबजी टाटा ट्रस्ट, मुंबई चे सहकार्य लाभले आहे.



अडाण नदीचे खोरे.

नदी ही विविध परस्पर संबंधीत घटकांची एक गुंतागुंतीची व्यवस्था आहे. गुंतागूंतीच्या व्यवस्था ह्या समजुन घ्यायला अवघड असतात, त्यांच्या बद्दल सहजपणे अंदाज बांधणे अवघड असते आणि त्या वेळोवेळी आश्चर्याचे धक्के देतात. अशा व्यवस्था समजुन घ्यायला विविध घटकांचा अभ्यास करणे गरजेचे असते आणि अशा व्यवस्थांशी संबंधीत व्यवस्थापन सुद्धा अतिशय लवचीकपणे कोणत्याही कठोर नियमांचा अवलंबन न करता करावे लागते.

नदी, तलाव, मासे, मासेमार

बचाओ अभियान

अभ्यास + कृती = शाश्वत विकास

संवर्धन संस्था

व्दारा श्री. दंडवते, धाबेकर महाविद्यालया समोर,

कारंजा लाड जि. वाशीम ४४४१०५

भारतातील नद्यांची, तलावांची आणि मास्यांची स्थिती चिंताजनक आहे. एका अभ्यासानुसार 2 हेक्टर पेक्षा मोठ्या क्षेत्रफळाचे भारतातील 48% पाणवठे नष्ट झाले आहेत उरलेले नष्ट होत आहेत. विश्व प्रकृती निधीच्या एका अहवालानुसार जगातल्या धोक्यात असलेल्या 10 महत्वाच्या नद्यात 2 नद्या भारतातील आहेत (गंगा आणि सिंधू). मास्यांची परिस्थिती सुद्धा गंभीर आहे. नैसर्गिक पाण्याची ठिकाणं नष्ट होणे, परदेशी मास्यांची संख्या वाढणे, शेतीत किटकनाशकांचा अती उपयोग, धरणे, तलावांचे रुपांतरण खुरट्या, काटेरी जंगलात होने अशा अनेक कारणांमुळे मासे झपाट्याने कमी होत आहेत. भारतात गो ा पाण्यातील मास्यांच्या एक हजारापेक्षा जास्त जाती आहेत दरवर्षी नविन संशोधनामुळे त्यात अधिक भर पडत असते. अडाण नदीतच जवळ जवळ शंभराच्या आसपास मास्यांच्या प्रजाती असाव्यात असा अंदाज आहे.

ह्या साऱ्या मानव निर्मित बदलांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम प्रत्येकावरच होतो आहे परंतु मासेमारी करणाऱ्या विदर्भातील ढिवर, केवट, भोई सारख्या जमातींवर त्याचा जास्त वाईट परिणाम होतो आहे. भारतात गो ापाण्यातील मासेमारीवर अवलंबून असणाऱ्या 387 जनजाती आहेत. ह्या जमाती शेकडो वर्षांपासुन नदीवर, तलांवांवर आपल्या उपजीवीकेसाठी अवलंबून आहेत. मासे पकडणे, तलावात सिंगा ाचे उत्पादन करणे, बोटीच्या सहाय्याने जलवाहतुक करणे, फुटाणे विकणे, शेती करणे सारखे विविध व्यवसाय हे लोक परंपरेने करायचे. विकासाच्या नावावर आपण धरणे बांधली, त्या धरणातील मासेमारीचा अधीकार आपण बाहेरच्या सधन ठेकेदाराला दिल्याने, रसायनयुक्त शेतीने, प्रदुषणाने शेकडो वर्षांपासुन मासेमारी करुन जगणारे पारंपारिक मासेमार विस्थापीत होण्याच्या मार्गावर आहेत.

नदीचे व पाणवठ्याचे १० महत्वाचे शत्रु

1) अधिवास नष्ट होणे.
2) परदेशी प्रजाती वाढणे.
3) प्रदुषण (सांडपाणी, रासायनीक शेती)
4) शेतीसाठी/कारखान्यांसाठी नदीतुन पाण्याचा फार जास्त प्रमाणात उपसा.
5) धरणे: धरणामुळे मास्यांचे स्थलांतराचे मार्ग खंडीत होणे. धरणामुळे गाळ साचुन एका प्रकारच्या अधिवासाचे रुपांतर दुसऱ्या प्रकारच्या अधिवासात होणे.
6) तलावात नदीत बेशरम, जलपर्णी सारख्या वनस्पतींची अतोनात वाढ होणे.
7) विघातक मार्गाने मच्छीमारी (पाण्यात करंट सोडून, विष टाकून,विस्फोटकाचा उपयोग करुन इत्यादी).
8) पाणलोट क्षेत्रातला झाडोरा नष्ट होने.
9) संसाधनांचा अती उपयोग.
10)वातावरणात बदल.

विदर्भाचा बहुतांश भाग हा गोदावरी खोऱ्यात मोडतो. गोदावरीचे खोरे हे भारतीय द्वीपकल्पातील (दक्षिण भारतातील) सर्वात मोठे खोरे आहे. वैनगंगा, पैनगंगा, वर्धा, प्राणहिता, इंद्रावती सारख्या नद्यांनी आणि ह्यांच्या उपनद्यांनी समृद्ध असा हा प्रदेश आहे. जैविक आणि भौगोलीक विविधतेच्या बाबतीतही विदर्भ हा समृद्ध असा प्रदेश आहे. पुर्वेकडील दाट पाणगळीची जंगले आणि भरपुर पावसाचा प्रदेश तर पश्चिमेकडील कमी पावसाच्या शेतीने आणि गवताळ जंगलाने समृद्ध असा हा प्रदेश आहे.

आता मासेमारी पुर्वी इतकी सोपी राहीली नाही! मासेमारी उध्वस्त झाल्याने करोडो मासेमार आपला परंपरागत व्यवसाय सोडून मजुरी सारख्या विकल्पांकडे वळत आहेत.

अडाण ही वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यातुन 209 कि.मी. येवढे अंतर वाहत जावून पैनगंगेला मिळणारी नदी आहे. पैनगंगेला मिळण्याआधी 15 कि.मी. वर अरुणावती नावाची नदी अडाणला येवून मिळते तसेच कारंजा (लाड) शहराजवळ ह्या नदीवर एक मोठे धरणही बांधण्यात आले आहे. परंतू अभ्यासाच्या आणि माहितीच्या उपलब्धतेच्या बाबतीत आपण गरीब आहोत. चांगल्या नैसर्गिक संसाधनाच्या व्यवस्थापनाचा आधार हा माहितीच्या उपलब्धतेवर अवलंबून असतो. अशा माहितीचा व्यवस्थित असा कोष तयार करण्याची आवश्यकता आहे. अशी माहिती बऱ्याच प्रमाणात विविध सरकारी विभागाकडे आहे. उदा. वाशीम जिल्ह्यात किती तलाव मासेमारी साठी उपलब्ध आहेत, त्यांचा लिलाव कोणाला, कधी, किती रुपयात झाला आहे इत्यादी प्रकारची माहिती सामान्य मासेमारास उपलब्ध झाल्यास बराच फायदा होवू शकतो. आज माहितीचा अधीकार कायदा सारख्या कायद्याने अशी माहिती सहजपणे एकत्रीत होवून ती माहिती सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचवल्या जावू शकते. अशा परिस्थितीत मासेमारांच्या सहकार्याने नदी, तलाव आणि मास्यांचे चांगले संवर्धन केल्या जाउ शकते. मासेमारांकडे ज्ञान आहे, त्यांना मास्यांच्या स्थितीबद्दल तज्ञांपेक्षाही जास्त चांगली माहिती आहे. पण जोवर मासेमार आर्थिक दृष्ट्या सबळ होत नाही तोवर संवर्धनाच्या कामात त्यांचा सहभाग प्राप्त केल्या जावू शकत नाही. या दृष्टीने संवर्धन आणि आर्थिक सबलीकरणाचे काम खालील पद्धतींनी होवू शकते असं आम्हाला वाटते.



1) माहितीची निर्मिती:

■ नदीचा व अन्य जल स्त्रोतांचा, व्यवस्थापणाचा, रोजगाराचा इतिहास जाणून घेणे.

■ सुरुवातीला अडाण नदीसाठी (व नंतर विदर्भासाठी) मासे, नदीच्या विविध अधिवासांची (अधिवास म्हणजे जीवजातींची राहण्याची जागा, त्यांच घर) सद्य स्थिती जाणून घेणे. त्या अधिवासाला असणारे विविध प्रकारचे धोके समजुन घेणे.

■ अडाण नदीतील विविध मासे, त्यांची सध्य स्थिती, त्यांचे सद्य प्रमाण, त्यांच्या प्रमाणात दिवसेन दिवस होत असलेले बदल जाणुन घेणे. मास्यांना असणारे विविध धोके जाणुन घेणे.

परदेशी शत्रू

तिलापीया ही दक्षिण अमेरीकेतुन भारतात 1962 मध्ये आयात करण्यात आली. तेंव्हा पासुन भारतात तीचे प्रमाण अतोनात वाढते आहे. तिलापीया ही स्थानिक मास्यांचे अंडे खाते, कोणत्याही परिस्थितीत जगते, आपल्या पिलांचा सांभाळ करते. 2003 मध्ये गडचिरोली जिल्ह्यातल्या कठाणी नदीत ह्या मास्याला लोकांनी पहिल्यांदा बघीतले. 2007 मध्ये कारंज्यातील ऋषी तलावातही ह्या मास्याला नोंदवण्यात आले आहे. ह्या मास्याने अनेक देशातील स्थानिक मास्यांना संपवले आहे, आता आपल्या विभागातील स्थानिक मास्यांसाठी हा मासा फार वाईट सिद्ध होवू शकतो.

■ अडाण नदीच्या पाणलोट क्षेत्रातील जमीन वापराचा अभ्यास करणे, विविध गावांची यादी तयार करणे. त्या विविध गावातील मासेमारी करणाऱ्या विविध जमातींच्या लोकसंखेचा अभ्यास करणे.

■ अडाण नदीच्या खोऱ्यातील मासेमारी करणाऱ्या जमातींच्या सामाजीक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक, रोजगाराच्या स्थितीचा अभ्यास करणे. त्यांचे जीव्हाळ्याचे मुद्दे जाणुन घेणे. विकासाच्या त्यांच्या संकल्पना जाणुन घेणे. त्यांचे विविध प्रश्न समजुन घेणे.

■ अडाण नदी खोऱ्यातील विविध प्रकारच्या तलावांचा डेटाबेस (माहिती व्यवस्था) तयार करणे. म्हणजे कोणते तलाव मासेमारांसाठी उपलब्ध होवू शकतात